## प्रकरण पहिले

## प्र स्ता व ना

## प्रकरण पहिले

## प्र स्ता व ना

भारताच्या राजकारणाचा अभ्यास करीत असताना आपणास स्थानिक राजकारणाचा अभ्यास करणे गरजेचे असते. कारण स्थानिक राजकारणावरच अंतिमतः राज्य व केंद्र स्तरावरील राजकारण आधारलेले असते. प्रस्तुत प्रबंधात सातारा तालुक्याच्या पक्षीय राजकारणाचा अभ्यास करण्यात आला आहे. सातारा तालुका हा भूतपूर्व उप पंतप्रधान श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या लोकसभा मतदार संघाचा एक भाग होता. पण सातारा तालुका अविकसित राहिला. १९७८ नंतर या तालुक्यात नवे राजकीय नेतृत्व उभे राहिले. या नव्या नेत्याने पोकळी भरून काढली. स्थानिक पातळीवरील राजकारण वेगवेगळी वळणे घेत आणि वेगवेगळ्या प्रवाहांनी वाटचाल करते. सातारा तालुक्याचे स्थानिक राजकारणाचा अभ्यास करण्याचा प्रस्तुत प्रबंधात प्रयत्न करण्यात आला आहे.

सातारा जिल्ह्याने महाराष्ट्राच्या इतिहासात महत्त्वाचे कार्य केलेले आहे. सातारा जिल्ह्यात फार पूर्वीपासून कॉंग्रेसची चळवळ लोकप्रिय होती व कॉंग्रेस ब्राह्मणेतर सत्यशोधक दलित व प्रतिसरकार या सर्व चळवळी या भागात झाल्या. यशवंतराव चव्हाण बाळासाहेब देसाई, दादासाहेब करंदीकर, भाऊसाहेब सोमण वगैरे नेते देशाला या जिल्ह्याने दिले.

### सातारा तालुका भौगोलिक परिस्थिती:

भौगोलिक दृष्ट्या सातारा जिल्हा उत्तर अक्षांश १७.५ ते १८.११ व पूर्व रेखांस ७३.३३ ते ७४.७४ यांच्यामध्ये येतो. सातारा जिल्ह्याचे क्षेत्रफळ सुमारे १०४८४ चौरस कि.मी. असून जिल्ह्यात ११ तालुके १४ शहरे

१४९० खेडी आहेत. सातारा जिल्हयाच्या दक्षिणेला सांगली उत्तरेला पुणे पूर्वेला सोलापूर व सांगली व पश्चिमेला रत्नागिरी हे जिल्हे येतात. सातारा जिल्हयाचे एकूण तीन भाग पडत असून पश्चिम भाग अतिपावसाचा डोंगराळ व हलक्या प्रतीच्या जमिनीचा आहे. जिल्हयाचा मध्य भाग हा पुणे - बंगलोर रस्त्याच्या कडेचा तसेच हमखास पावसाचा असून तेथे ७00 ते १000 मि.मी. पाऊस पडतो. जिल्हयाचा पूर्व भाग हा अवर्षण प्रवण असून यामध्ये खटाव, भाग, फलटणचा पश्चिम भाग, खंडाळा, कोरेगाव या तालुक्यांचा समावेश होतो.

अशा या सातारा जिल्हयातील ११ तालुक्यापैकी एक सातारा तालुका आहे. सातारा तालुका उत्तर अक्षांश १७ ते १८ व पूर्व रेखांस ७४ यामध्ये येतो. या तालुक्याचे क्षेत्रफळ सुमारे एक हजार चौरस कि.मी. आहे. या तालुक्यात सातारा हे जिल्हयाचे व तालुक्याचे ठिकाण असलेले एकमेव शहर आहे. व सुमारे १२५ एवढी खेडी असुन तालुक्याची लोकसंख्या १९८१ च्या जनगणनेनुसार सुमारे १ लाख २५ हजार इतकी आहे. सातारा तालुक्याच्या पूर्वेला कोरेगाव पश्चिमेला जावळी, उत्तरेला वाई व दक्षिणेला कराड, पाटण हे तालुके आहेत.

तसेच सातारा शहराच्या पश्चिमेला १२ किलोमिटरवर परळी येथे श्रीसमर्थ रामदास स्वामींचे वास्तव्य असलेला सज्जनगड आहे. तसेच शहराच्या पश्चिमेलाच परळीकडे जाताना बोगदयाच्या बाहेर पडले की १ मैलावर खिंडीच्या गणपतीचे देवस्थान आहे. शहराच्या पश्चिमेलाच यवतेश्वर डोंगर आहे. सातारा शहराच्या दक्षिणेला असलेला मोठा किल्ला अजिंक्यतारा आहे.

सातारा तालुक्यातील जमिनीचा पश्चिम भाग हा अति पावसाचा डोंगराळ व हलक्या प्रतीच्या जमिनीचा आहे. त्यात शेतकरी पारंपारिक

पध्दतीने भात, नाचणी, वरी व ज्वारी इ. अन्नधान्याची पिके घेतात सातारा तालुक्याच्या पूर्वेकडील भागातील जमिनी मध्यम प्रतीच्या आहेत. तेथे ७०० ते १००० मि.मि. पर्यंत पाऊस पडतो. या भागात ज्वारी, भुईमुग, ऊस, हळद, आले ही पिके प्रामुख्याने घेतली जातात. एकंदर शेतीच्या बाबतीत हा तालुका मागासलेलाच आहे. परंतु अलिकडे कन्हेर धरणाचा थोडाफार फायदा या तालुक्याला झाला आहे. तसेच अजिंक्यतारा सहकारी साखर कारखान्याच्या सौजन्याने ब-याच जलसिंचन योजना या तालुक्यात झाल्या आहेत. तसेच उरमोडी प्रकल्पाचे काम हाती घेण्यात आले आहे. त्यामुळे या भागात ब-याच प्रमाणात शेतीला जीवदान मिळाले आहे.[१]

ऐतिहासिक पार्श्वभूमी:

भारताच्या स्वातंत्र्य लढयात महाराष्ट्राचा सिंहाचा वाटा असून सातारा जिल्हयातील क्रांतीकारकांनी केलेल्या प्रयत्नामुळे एकूण देशाच्या राजकिय जीवनावर त्याचा परिणाम झालेला आहे. महाराष्ट्र हा द-या-खो-याचा, डुगडांचा प्रदेश असून तेथील जमिनही फारशी सुपीक नाही. पाऊस नियमित स्वरुपात पडत नाही त्यामुळे या प्रतिकूल परिस्थितीशी संघर्ष करीत आपला संसार गाडा चालविण्याची पिढयात पिढया सवय महाराष्ट्राच्या शेतक-याला लागलेली दिसून येते. कष्ट करुन न्याय-नितीच्या मार्गाने प्रपंच करावा ही ज्ञानेश्वरांपासून ते रामदासापर्यंतच्या संतांनी दिलेली शिकवण आहे. या जिल्हयात ज्याप्रमाणे साधुसंत होऊन गेले त्याच प्रमाणे ज्ञानी पुरुष व अनेक थोर समाज सुधारकही होऊन गेले. छ. शिवाजी महाराजांच्या पासून समर्थ रामदास न्यायबुध्दीने नाव लौकिक मिळविले रामशास्त्र प्रभुणे, थोर समाज सुधारक आगरकर, साहित्य सम्राट न.चि. केळकर, नव काव्याचे जनक बा.सी. मर्ढेकर क्रांतिसिंह

नाना पाटील, कर्मवीर भाऊराव पाटील, आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार व पहिले मुख्यमंत्री के. यशवंतराव चव्हाण आणि विश्व कोषाचे निमार्ते तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी जन्म घेऊन स्वत:बरोबरच सातारा जिल्हयालाही महान केले आहे.[२]

काही इतिहासकारांच्या मते साता-याच्या परिसरात इ.स.पूर्व २०० मध्ये बौध्दांचा अंमल होता. तिस-या ते तेराव्या शतकापर्यंत चालुक्य, राष्ट्रकूट, सिंधण, शिलाहार, यादवराजे साता-यावर राज्य करीत होते. १४व्या शतकामध्ये देवगीरीचे यादव आणि त्यानंतर हा प्रदेश बहामणी राज्याच्या अमलाखाली आला. १४९८ ते १६५५ पर्यंत हा प्रदेश अदिलशाहाकडे होता. पुढे छ. शिवाजी महाराजांनी शून्यातून निर्माण केलेले मराठ्यांचे राज्य वाढवीत असतानाच १६६१ साली त्यांनी परळी व साताराचा अजिंक्य तारा किल्ला जिंकला.[३]

१७०७ ते १८४८ - १७व्या शतकात युग पुरुष छ. शिवाजी महाराजांनी मराठमोळ्या मावळ्यांना साथीला घेऊन दिल्लीपती औरंगजेब, विजापूरचा आदिलशाहा आणि जंजि-याचा सिद्दी यांच्याशी टक्कर देऊन स्वराज्य स्थापन केले. पोर्तुगीज, इंग्रज सारख्या परकीय सत्तांनाही आपल्या सामर्थ्याची जाणीव करून दिली. छ. शिवाजी महाराजांनी हा जो स्वातंत्र्याचा विचार निर्माण केला त्याने भावी पिढयांना प्रेरणा मिळाली. स्वातंत्र्याची ही विजिगीषुवृत्ती पुढील पिढयांना मार्गदर्शक व प्रेरक ठरली. इंग्रजांच्या अन्यायी राजवटी विरुध्द लढण्यासाठी मराठी जनतेला शिवरायांच्या पासून प्रेरणा मिळाली, मराठी सत्तेचा शेवट करण्याचा विडा उचललेल्या औरंगजेबालाही सत्तावीस वर्षे महाराष्ट्रात प्रचंड सैन्यानिशी येऊनही ही सत्ता नष्ट करता आली नाही. आपल्या मृत्यूच्यावेळी त्यांच्या कैदेमध्ये असलेला

मराठ्यांचा राजा छ. शाहू महाराज यांच्या सुटकेविषयीची पुसटशी कल्पना त्याने आपल्या अधिका-यांना व मुलांना दिली होती. कारण शाहूची सुटका केली तर मराठ्यांच्यामध्ये सत्तेसाठी दोन गट (शाहू-ताराबाई) निर्माण होऊन ते आपापसात लढतील. शाहूच्या सुटकेनंतर मराठ्यातील एक गट ताराबाईच्या नेतृत्वाखालचा व दुसरा शाहूला मानणा-यांचा गट निर्माण झाला. आणि हे दोन गट एकसंध मराठी राज्याचे दोन शकले करण्यास कारणीभूत ठरले. ताराबाईने वारणा-नदीच्या दक्षिणेकडच्या कोल्हापूर शहरात आपल्या राजधानीचे ठिकाण केले. तर शाहूने सातारा येथे आपल्या राज्याची राजधानी केली. शाहूला स्थैर्य मिळवून देण्यासाठी बाळाजी विश्वनाथने केलेल्या मदतीची परतफेड म्हणून शाहूने मानू घराण्यातील बाळाजीला वंशपरंपरेने पेशवाई दिली आणि पुढे छत्रपतींची सत्ता अशा प्रकारे पेशव्यांच्या हाती गेली.[४]

पुढे छत्रपती नामधारी बनले व पेशवे आणि इतर मराठे सरदार यांच्यातील स्वार्थी मंडळींच्या लाथाळ्यामुळे इंग्रजांसारख्या परक्या सत्तेचे फावले व तिने पुण्याच्या शनिवार वाड्यावरील भगवा झेंडा उतरवून तेथे युनियन जॅक फडकविला व पुढे १८५२ साली साताराचे सर्व राज्य इंग्रजांनी खालसा करून टाकले.

राष्ट्रीय वृत्ती या सारख्या सा-या विरवृत्ती विझून गेलेल्या महाराष्ट्राच्याच नव्हेतर सबंध भारतातील प्रजेप्रमाणे साताराची प्रजा इंग्रजांच्या राजवटीमध्ये समाधान मानून कसलेही बंड, किंवा गोंधळ, पडझड न करता १८८५ च्या कॉंग्रेस स्थापनेपर्यंत निपचित जीवन जगत होती. हे कटू सत्य नाकारून चालणार नाही.[५]

**१८८५ ते १९२०** - महाराष्ट्रात इंग्रजी अम्मल स्थिर झाल्यानंतर येथील नव सुशिक्षितांना हळू हळू पाश्चात्यांच्या उद्योग प्रधान संस्कृतीची ओळख

झाली त्यामुळे मूठभर इंग्रजांच्याकडून आपण पराभूत कसे झालो ? जगात इतर देशांच्या मानाने मागे का पडलो ? सारे भारतीय एकात्मतेच्या भावनेने का वागत नाहीत ? या सारख्या प्रश्नांनी इंग्रजी शिक्षण घेतलेला भारतीय अस्वस्थ बनला. त्याची उत्तरे शोधण्यासाठी चिंतन करू लागला व त्यातूनच त्याला आकलन झाले की ज्ञान ही एक प्रचंड शक्ती असून त्यांच्या साह्यानेच आपला उत्कर्ष होऊ शकेल. परंपरा, अनिष्ठरूढी यांचा वरचष्मा कमी करता येईल प्राचीन विद्या व ज्ञानाचा पाठ पुरावा केल्यामुळे जगात आपणाला स्वाभिमानाने व मानाने जगता येईल असा आत्मविश्वास त्यांच्यामध्ये निर्माण झाला व त्यातूनच इंग्रजी राजवटीविरुद्ध चीड निर्माण झाली व मातृभूमीला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी स्वतःला स्वातंत्र्याच्या अंदोलनात झोकून देण्याचे धाडस आले. त्यामुळे एकेकाळी केवळ ठराव करणारी राष्ट्रीय कांग्रेस ही एक लढाऊ संघटना बनली. आणि तिनेही लोकमान्य टिळकांसारखा क्रांतीकारी मार्गाचा अवलंब केल्यामुळे स्वातंत्र्य अंदोलनाला एक प्रकारची धार चढली. इ.स.१८८५ ते १९२० या महाराष्ट्र क्राँग्रेसच्या टिळकयुगाच्या काळात साताऱ्याला क्राँग्रेसची बीजे मोठ्या प्रमाणात रुजली. असे म्हटले जाते की सातारा व पुणे जिल्ह्यातच कांग्रेसचे मोठ्या प्रमाणात पाठीराखे होते. टिळकांना पाठींबा देणारे दादासाहेब करंदीकर यांचे कार्य क्षेत्र सातारा हे होते. पुन: ब्राहमणेत्तर चळवळीचे मोठे पुढारी भास्करराव जाधव व आण्णासाहेब लठ्ठे हे ही याच भागात कार्यरत झाले.

<u>१९२० ते १९४७</u> - १९२० ला टिळकांच्या मृत्यूनंतर भारताच्या राजकीय क्षितिजावर महात्मा गांधींच्या प्रभावशाली नेतृत्वाचा उदय झाला. त्यांनी १९२० - २१ ला असहकार चळवळ सुरू केली. त्यामुळे स्वातंत्र्याचा लढा प्रभावी होऊन इंग्रज सरकार अडचणीत आले. या देशावर राज्य महात्मा गांधींचे की इंग्रजांचे असा संभ्रम निर्माण झाला.

महात्मा गांधींच्या हाकेसरशी डॉ. राजेंद्र प्रसाद व असंख्य नेत्यांनी व कार्यकर्त्यांनी आपल्या नोकरीवर व वकिलीवर पाणी सोडले. व ते असहकार चळवळीत सामील झाले. शेतावर राबणारा शेतमजूर व कामगार या चळवळीत सामील झाला. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीने प्रभावशाली दिशा पकडली. स्वातंत्र्याच्या या लढयामध्ये लोकमान्य टिळकांच्या या लढाऊ नेतृत्वापासून महाराष्ट्र आघाडीवर होता.

महाराष्ट्रातील शहरी जनता महात्मा गांधींच्या असहकार चळवळीत सामील झाली. गंगाधर देशपांडे, के.पी. खाडीलकर, शि.म. परांजपे, मामासाहेब देवगिरीकर, शंकरराव देव, शंकरराव मोरे, काकासाहेब गाडगीळ, आचार्य जावडेकर, एस्.एम्. जोशी, ना.ग. गोरे इ. लोकांनी कॉंग्रेसच्या झेंड्याखाली येऊन स्वातंत्र्याची चळवळ जोमाने चालविली. तोपर्यंत कॉंग्रेस चळवळी पासून आणि गांधींच्या नेतृत्वापासून या वेळेपर्यंत महाराष्ट्रातील बराच मोठा बहुजन समाज व त्यांचे काही नेते अलिप्त होते. कारण महाराष्ट्र कॉंग्रेसवर ब्राहमन नेत्यांचे वर्चस्व होते. आणि ब्राहमण व ब्राहमणेतर वादामुळे त्यांच्यात ही दरी निर्माण झाली होती. १९३० मध्ये गांधींनी सुरु केलेल्या कायदेभंगाच्या चळवळीमुळे संपूर्ण देशाचे राजकीय चित्र बदलून गेले. गांधी नेहरु युगाची चाहूल लागली होती. पुढारी वर्ग आतापर्यंत राष्ट्रीय प्रवाहापासून दूर असलेला महाराष्ट्रातील ब्राहमणेतर पुढारी वर्ग केशवराव जेधे यांच्यासह १९३० च्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीमध्ये सामील झाला. त्यामुळे महाराष्ट्रातील बहुजन समाजही स्वातंत्र्याच्या चळवळीत व राष्ट्रीय प्रवाहामध्ये सामील झाला. शेतकरी वर्ग इंग्रजाविरुद्ध ब्राहमणांच्या खांद्याला खांदा देऊन लढू लागला ही घटना सामाजिक व राजकीय जागृतीचे खरे दर्शन या चळवळीमधून दिसले. केशवराव जेधे व दिनकरराव जवळकरांच्या आव्हानाला साथ देऊन बहुजन समाज स्वातंत्र्य लढयात उतरला.[६]

## १९३७ च्या विधानसभा निवडणुका:

सप्टेंबर १९३२ मधील येरवडा जेलमधील महात्मा गांधीजींचे प्राणांतिक उपोषण त्यातून अस्पृश्यांचे स्वतंत्र मतदान संघ रद्द करणारा डॉ. आंबेडकरांच्या बरोबर झालेला पुणे करार, ब्रिटीश सरकारची १९३३ सालची श्वेत पत्रिका वगैरे ब-याच घडामोडीनंतर अखेर भारताला साम्राज्यांतर्गत स्वराज्य (डोमिनियन स्टेटस) देणारा १९३५ चा ब्रिटीश पार्लमेंटचा कायदा झाला. त्यात स्वराज्य तर नव्हतेच पण साधी प्रांतिक स्वायत्तत्ताही नव्हती कारण बहुमतवाल्या पक्षाला मंत्रीमंडळ बनवता येईल. ते विधान सभेला जबाबदारही असेल पण विशेषाधिकार राज्यपालाला देण्यात आला होता.

तरीही भारतीय राष्ट्रीय कांग्रेसने सर्वच्या सर्व अकरा राज्यातील विधानसभा निवडणुका लढविण्याचे ठरविले कारण या निवडणुकीत मतदानाचा हक्क पाऊणशे रुपये शेतसारा असलेल्या जमिनीपासून आठ रुपये आकाराची मालकीची अगर तेवढी जमिन कसणा-या कुळालाही मिळाला होता.

मुंबई राज्यातील (आजचा महाराष्ट्र) सातारा जिल्हयाला आठ विधानसभा सदस्यांच्या जागा मिळाल्या होत्या. १) दक्षिण भागातील कराड, पाटण, खानापूर, वाळवे, तासगाव व शिराळे पेटा यांच्यासाठी चार जागा तर, २) उत्तर भागातील सातारा, कोरेगाव, वाई, जावळी, खटाव हे तालुके व माण आणि महाबळेश्वर या दोन पेटयांना चार जागा मिळाल्या होत्या.

सातारा जिल्हयाच्या उत्तर भागातील १) श्री. शंकर हरी साने वकील, २) श्री. बाबासाहेब जगदेवराव शिंदे (आरवाडकर),

१) राखीव जागेसाठी वाईचे श्री. झापे अशा तिघांना कॉंग्रेस पक्षाची तिकिटे देण्यात आली. पण स्पृश्य मतदारांनी हरिजन उमेदवारास मते देण्याची टाळाटाळ केल्याने त्या जागी डॉ. आंबेडकर यांच्या स्वतंत्र मजूर पक्षाचे खंडेराव सावंत निवडून आले व झापे पराभूत झाले. कॉंग्रेसचे श्री.साठे व बाळासाहेब खारवाळकर हे दोघे निवडले गेले. पण खान बहादूर डी.सी. कूपर या ब्रिटीश धार्जिण्या धनाढय पारशी गृहस्थाने सर्व आर्थिक व अधिकार पदाची ताकद एकवटून पहिल्या नंबरची मते मिळविली.

दक्षिण जिल्हयाच्या दक्षिण भागात वाळवे तालुक्यातील बोरगांवचे आत्माराम पाटील हे त्यागी, हुषार तरुण आपल्या कच्छपी रहाणार नाहीत म्हणून त्यांना डावलून बहुजन समाजातील सरकार धार्जिण्या जमीनदार अगर व्यापाऱ्यास तिकीट देण्याचे प्रयत्न सातारा व कराडच्या उच्च वर्णीय कॉंग्रेस नेत्यांनी चालविले. अखेर तरुण कॉंग्रेस कार्यकर्त्यांनी मुंबईस सरदार पटेल यांच्यापर्यंत दाद मागून आत्माराम पाटील यांना तिकिट मिळवून दिले. आत्माराम पाटील, कराडचे खादीधारी बडे सावकार श्री पांडु आण्णा शिराळकर व श्री.भाऊसाहेब कुदळे असे तीन उमेदवार कॉंग्रेसतर्फे उभे करण्यात आले.

कॉंग्रेसच्या तीनही उमेदवारांनी कॉंग्रेसचा म्हणून एकत्र फिरुन प्रचार न करता वेगवेगळे फिरुन शक्य तेवढया जास्त लोकांची चारही मते आपणा एकटयाला मिळण्यासाठी प्रचार केला. अखेर १) आत्माराम पाटील हे बहुसंख्य राष्ट्रीय वृत्तीच्या लोकांची मते मिळवून पहिल्या नंबरची ३७१२० मते मिळवून मुंबई राज्यात पहिले आले. २) श्री. पांडु आण्णा शिराळकर हे पैशाचा वापर समाजात सेवा संघाला तीस हजार रुपये देणगी देण्याची जाहिरात करुन चौथ्या क्रमांकाने निवडून आले,

श्री शंकरराव मोहिते हे तरुण वकील तिसऱ्या क्रमांकाने तर
४) जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्ष रावसाहेब आण्णाप्पा नारायण
कल्याणी हे पैसा व अधिकार पदाच्या आधारे दुसऱ्या क्रमांकाने निवडून आले.

सातारा जिल्ह्याला सत्तेत वाटा नाही:

प्रथम साडेतीन महिने खान बहादूर कूपर यांचे बाहुले मंत्रीमंडळ व नंतर कॉंग्रेसने सत्ता संपादनाचा निर्णय घेतल्यावर १७ जुलै ३७ पासून सव्वादोन वर्षे बाळासाहेब खेरांचे कॉंग्रेस मंत्रीमंडळ अधिकारावर आले. पण त्यातील मंत्र्यांच्या नऊ जागा कर्नाटक, गुजराथ, महाराष्ट्राचा पश्चिम भाग, मुंबई यामधील निरनिराळ्या जातींना विभागून देण्यात आल्या त्यात नगरचे श्री. लक्ष्मणराव कोल्हे पाटील या तरुण वकीलाची वर्णी लागली. थोड्याच दिवसांनी श्री. शंकरराव मोहिते यांनी मोठी नोकरी मिळाल्याने आमदार पदाचा राजीनामा दिला त्या जागी कॉंग्रेसचे श्री. चंद्रोजी पाटील (कामेरीकर) हे बिन विरोध निवडून आले.[७]

धनजी शाहा कूपरचे राजकारण:

खान बहादूर धनजी शाहा बोमनजी कूपर हे त्या गृहस्थाचे नाव, शिक्षण जेमतेम जुन्या काळची मॅट्रिक पर्यंत. मुंबई अहमदाबाद अशी कारखानदारीची शहरे सोडून कूपर घराणे सातारा येथे स्थाईक झाले. साताऱ्यातील पाडळी (सातारा रोड) येथील नांगर, ऐंजिने, शेती अवजारे वगैरेंचा लोखंडी कारखाना, जिल्ह्यातील दारु दुकानांची होलसेल एजन्सी, जंगल संपत्तीची व इतर अनेक प्रकारची कंत्राटे, इंग्रज सरकारच्या कृपेने मिळालेली अशी गडगंज संपत्ती मिळविलेली, राजकीय धोरण म्हणावे तर "राजापेक्षा राजनिष्ठ" त्यांनी बहुजन समाजातील सत्तालोलुप

व स्वार्थी कोणत्याही गोष्टींचा विधिनिषेध न बाळगणाऱ्या लोकांना एकत्र आणून इंग्रज सरकारकडून रावसाहेब, खानसाहेब, कैसर – ई –हिंद पदक असे किताब आणि निरनिराळी कंत्राटे मिळवून देण्याच्या लालसेने कॉंग्रेसच्या स्वातंत्र्य लढयापासून जनतेला दूर ठेवण्याचे प्रयत्न केले.

१९१०–११ पासून कोल्हापूरचे राजर्षि शाहू छत्रपती यांच्या प्रेरणेने सत्यशोधक समाजाचे पुनरुज्जीवन होऊन खेडयात शिक्षण प्रसार, जुन्या धार्मिक रुढी, अज्ञ समजुती विरोधी मोहीम सुरु झालेली. या वातावरणाचा फायदा घेऊन नामदार भास्करराव जाधव आदि नेत्यांच्या पुढाकाराने ब्राह्मणेतर पक्ष सुरु झाला. १९२३ साली सुरु झालेल्या नवीन जिल्हा लोकल बोर्ड निवडणूकात तो पक्ष उतरला खुद्द भास्करराव जाधव मुंबई कौंसिलवर निवडून जाऊन शिक्षण मंत्री झालेले होते पण अशाही परिस्थितीत कूपरशहांनी त्या प्रवाहाला तोंड देत सातारा जिल्हा लोकल बोर्ड, स्कूल बोर्ड, सातारा व इतर ठिकाणच्या नगरपालिका वगैरे स्थानिक स्वराज्य संस्थांची सुत्रे आपल्या हाती ठेवली होती.

नेतृत्वाचीच चढती कमान:

१९२३ साली जिल्हा लोकल बोर्डाची स्थापना झाली त्याही पूर्वी कूपरशहानी आपले बस्तान चांगले बसविले होते. १९१० साली किर्लोस्करवाडी येथे नांगर शेती अवजारे वगैरेचा लोखंडी कारखाना सुरु झाला. पण एकच कारखाना एकाधिकार पध्दतीने विक्री होईल देशी मालाचा प्रसार या तत्वासाठी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी त्या कारखान्याची एजन्सी काही काळ चालविली. पण लगेच कूपर शहानी सातारा रोडला नवा कारखाना सुरु केला व धंद्यात आघाडी मारली. हेच कूपर शहा मराठ्यांमधील दुहीचा फायदा घेऊन १९३२ साली खुद्द भास्करराव जाधवानाच पराभूत करुन मुंबई

कौन्सिलवर निवडून गेले व १९३३ च्या अखेरीस गव्हर्नरने त्यांना मंत्री म्हणून नेमले. त्यांच्या मोकळ्या जागी मात्र बदलत्या वातावरणात जून १९३४ मध्ये काकासाहेब चोरेकर यांना पराभूत करून कॉंग्रेसचे भाऊसाहेब सोमण निवडून आले.

सातारा नगरपरिषदेचे अध्यक्षपद ओळीने तीन वेळा कूपर शहांना मिळाले. नंतर ते जिल्हा बोर्ड अध्यक्ष झाले. २४ वर्षे ऑनररी मॅजिस्ट्रेट म्हणजे त्या काळातील मोठी मानाची जागा भोगली. खान बहाद्दुर पदवीनंतर १९३६ साली "सर" हा अत्युच्च किताब ब्रिटीश सरकारने त्यांना दिला. त्यांनी १९३५ सालच्या जिल्हा लोकल बोर्ड निवडणूका कुठल्याही राजकीय पक्षाने लेबल न लावता पुन्हा जिंकून आपल्या मागून आपले निकटचे सहकारी कोळे येथील रावसाहेब आणाप्पा नारायण कल्याणी यांनी अध्यक्षपद व काकासाहेब चोरेकर यांना स्कूल बोर्डाचे चेअरमन पद मिळवून दिले. १९३७ साली कॉंग्रेसच्या तुफानी प्रचारातही कूपरशहा स्वत: उत्तर सातारा मतदार संघातून पहिल्या नंबरने मते मिळवून विधान सभेवर निवडून आले. कॉंग्रेसने अजून सत्ता स्वीकार करावयाचा की नाही हे ठरविले नव्हते. त्याकाळात कूपर यांनी सरकार बनविले व साडेतीन महिने ते मुंबई राज्याचे पंतप्रधान बनले.

अशा या कूपर शहाचे प्रत्येक तालुक्यात वजनदार ब्रिटीश धार्जिणे पुढारी होते. काही जिल्हा बोर्डात निवडून येत तर काहींना १/४ सरकार नियुक्त सदस्यांमध्ये संधी मिळे काही रावसाहेब, खानसाहेब होते, त्यात तासगावचे सदाशिव बाळाजी शेटे, इस्लामपूरचे युसुफ मोमीन, कराडचे दादासाहेब जकाते, वाटयाचे विठोबा पाटील, खानापूरचे धोंडीबा पाटील काकासो चोरेकर, तडसरचे तात्या रावजी, पाटण तालुक्यातील शंकरराव काळे, बापूराव काळे, कोळे येथील रावसाहेब कल्याणी, कोरेगावचे आर.जी. कुलकर्णी वकील, दुधगावचे भाऊसाहेब कुदळे, यांचा समावेश होतो. या

लोकात मराठे, ब्राह्मण, मुसलमान, जैन, लिंगायत वगैरे सर्व जाती जमातीचे लोक होते.[8]

पण १९३७ नंतर कूपर, भास्करराव जाधव वगैरे नेते निष्प्रभ झाले व हळू हळू नवे नेते उदयास येऊ लागले.

१९४२ चे चले जाव आंदोलन हे भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतील एक रोमहर्षक पर्व होय. या आंदोलनाने एक नवा इतिहास घडविला. देशभर सुरु झालेल्या या आंदोलनाचे लोण महाराष्ट्रातही एखादया वनव्याप्रमाणे महाराष्ट्राच्या कानाकोप-यात पसरले. त्यामध्ये सातारा जिल्हा आघाडीवर होता. सातारा जिल्ह्यातील कॉंग्रेस कार्यकर्ते व तरुण या चळवळीत आवेगाने सामील झाले होते. जी.एस्. आळतेकर, क्रांतिसिंह नाना पाटील, यशवंतराव चव्हाण, किसनवीर, बाबूराव घोरपडे, बाबूराव गोखले, भाऊसाहेब सोमण, शेंडा काका, वसंतदादा पाटील, अंतूकाका बर्वे, जी.डी. लाड, नाथाजी लाड, पांडू तात्या बोराटे, रा.तु. पाटील, संभाजीराव थोरात, नागनाथ नायकवडी, बाबूजी पाटणकर, भगवानराव मोरे (बाप्पा) या सारख्या शेकडो ज्ञात, अज्ञात क्रांतिकारकांनी या चळवळीत भाग घेतला.

इंग्रजांची १५० वर्षांची राजवट उलथून टाकण्यासाठी मिळेल त्या परवडेल त्या मार्गाने जनता जाऊ लागली. देशाच्या कानाकोप-यात रेल्वेगाडया, रेल्वे स्टेशन्स, पोलीस चौक्या, शासकीय वसतिगृहे, कचे-या, तारा, पोलीस स्टेशन्स जाळून टाकण्यात आले. सभा मोर्चे हरताळ इ. मार्गाने सा-या देशात ब्रिटीश विरोधी वातावरण तप्त झाले व या चळवळीत महाराष्ट्र आघाडीवर होता. त्यापेक्षा सातारा तर अधिक आघाडीवर होता. या आंदोलनातील साताराची कामगिरी अभूतपूर्व होती. क्रांतिसिंह नाना पाटीलांसारख्या धाडशी पुढा-याने ४२च्या लढयात आपल्या क्रांतीकारक लढयाने इंग्रजांच्या छातीत धडकी भरवली होती. सातारा जिल्ह्यातील तरुणांच्यात वीरश्री निर्माण करुन इंग्रजांची पाशवी सत्ता उखडून टाकली.

१९४६ च्या विधानसभा निवडणूकीत काँग्रेसचे आठही जागी उमेदवार निवडून आले. बाळासाहेब खेर यांच्या मंत्रीमंडळात यशवंतराव चव्हाण यांची संसदीय सचीव म्हणून वर्णी लागली. त्या काळात त्यांनी मोरारजी देसाई यांच्या हाताखाली चोख काम केले.

१९४९ साली शेतकरी कामगार पक्षाची स्थापना झाली. त्यास जिल्ह्यातील नाना पाटील, व्ही.एन्. पाटील, केशवराव पवार, यशवंतराव चव्हाण वगैरे अनेक बहुजन समाजातील नेते सामील झाले. काँग्रेस पक्षाला या पक्षाने १९५२ च्या विधान सभा निवडणूकीत चांगलेच आव्हान दिले. परंतु काँग्रेसने बहुसंख्य जागा जिंकली. यशवंतराव चव्हाण निवडून आले. आणि मोरारजी देसाई यांच्या मंत्री मंडळात ते पुरवठा खात्याचे मंत्री झाले. पण त्याच काळात हळू हळू संयुक्त महाराष्ट्राची चळवळ सुरु झाली होती. त्या चळवळीस लोकांचा पाठिंबा होता. शेवटी १९५६ साली नवे मुंबई राज्य स्थापन झाले. मोरारजी देसाईनी मुख्य मंत्रीपदाचा राजीनामा दिला.[१]

## १९५६ यशवंतराव चव्हाण नव्या मुंबई राज्याचे मुख्यमंत्री:

१९५६ पासून जवळ जवळ ४ वर्षे चाललेला मुंबई सह संयुक्त महाराष्ट्र निर्मितीचा लढा हा महाराष्ट्राच्या इतिहासातील चिरस्मरणीय म्हणावा लागेल. यशवंतरावांच्या नेतृत्वाची आकांक्षांची पर्वा न करता सांगली - साताऱ्यातील जनतेने या लढ्यात हिरीरीने भाग घेतला. सातारा जिल्ह्याने नेतृत्व करण्यासाठी पाठविलेले नेते यशवंतराव चव्हाण यांनी लढयाला तोंड फुटण्यापूर्वीच संयुक्त महाराष्ट्र व पंडीत नेहरूंचे नेतृत्व या दोहोमधून एकाची निवड करण्याची पाळी आली तर मी नेहरूंच्या नेतृत्वाची निवड करेन असे पत्रकारांच्या पुढे सांगून टाकले होते. परंतु सांगली-साताऱ्यातील लोकांनी आपले म्हणून क्षमा केली नाही. त्यांना महाराष्ट्रभव दौरे काढून जाहीर सभा घेणे अशक्य करुन टाकले.

## १९५७ ला संयुक्त महाराष्ट्र समितीकडून कॉंग्रेसचा पराभव:

१९५७ च्या निवडणूकीत पश्चिम महाराष्ट्रात कॉंग्रेसला सपशेल आपटी बसली. १३३ जागापैकी फक्त ३२ जागा कॉंग्रेसला मिळाल्या. पण पुन्हा विदर्भ मराठवाडयातील आमदारांच्या संमतीने व पं. नेहरूंच्या पाठिंब्यामुळे तेच मुख्यमंत्री झाले.

संयुक्त महाराष्ट्राच्या लढयात साताराला आणखी एका दृष्टीने महत्त्व आहे. यशवंतराव चव्हाण व बाळासाहेब देसाईनी याच सुमारास एक प्रचंड निधी गोळा करून प्रताप गडावर श्री. शिव छत्रपतींचा पूर्णाकृती अश्वारूढ पुतळा उभा करून त्याचे अनावरण पंडीत नेहरूंच्या हस्ते उरकण्याचा घाट घालून महाराष्ट्रीयन जनतेचे प्रेम मिळविण्याचा प्रयत्न केला. तरीही संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीने द-याखो-यात दीड-दोन दिवस उन्हातान्हात काळया झेंडयांनी घोषणा देत आलेला प्रचंड जनसागर पाहून खरा महाराष्ट्र कोठे आहे ? तो का दुखावला आहे हे लोकशाही प्रेमी पंडीत नेहरूंनी ओळखून त्या दिवसापासून त्यांनी आपले धोरण बदलून १ मे १९६० रोजी मुंबईसह महाराष्ट्र संयुक्त महाराष्ट्राचे उद्घाटणही पंडीत नेहरूंच्या हस्ते झाले. [१०]

## १९६० ते १९८७, १९६० नंतरचे राजकिय बदल:

महाराष्ट्रामध्ये १९६० नंतर पंचायती राज संस्थांची स्थापना झाल्यामुळे येथील राजकारणाला नव्याने महत्त्व प्राप्त झाले. कृषी उत्पादनावर प्रक्रिया करणारे साखर कारखान्यान सारखे नवीन नवीन कारखाने निर्माण होऊन त्यातूनच ग्रामीण स्थरावरील नवे पुढारी राजकारणामध्ये भाग घेऊ लागले. तालुका स्थरावर राजकारण करताना आपल्या हातामध्ये राजकीय सत्ता केंद्रीत करण्याचा प्रयत्न करू लागले. राजकीय सत्ता हस्तगत करण्यासाठी धर्म, जात, वर्ग, प्रदेश आणि त्या विभागातील लोकोपयोगी कार्य इत्यादींचा

वापर करु लागले. राजकीय सत्ता ही राजकीय संस्थांच्या द्वारेच मिळत असल्यामुळे त्या ताब्यात घेण्याचा प्रयत्न सुरु झाला. त्यातून गटबाजीला सुरुवात झाली. भारतात आणि महाराष्ट्रामध्ये कॉंग्रेसचीच सत्ता असल्यामुळे ही मंडळी अन्य कुठल्याही विरोधी पक्षामध्ये न जाता त्यांनी पक्षान्तर्गत गट निर्माण करावयास सुरुवात केली. म्हणूनच स्थानिक राजकारण हे विविध गटात असते. याची जाणीव होउ लागली. या गटांच्या राजकारणातील पुढाऱ्यांची इच्छा आमदार बनण्याची असते कारण त्यामुळे महाराष्ट्राच्या राज्यस्थरीय सत्ता केंद्रासी संबंध जुळून मंत्रीपद मिळण्याची आकांक्षा वाढून राजकिय क्षितिजे अधिकात अधिक रुंद होण्याची शक्यता असते.

म्हणूनच जिल्हा राजकारणाबद्दल लिहिताना प्रा. रजनी कोठारी म्हणतात,

**" The district politics is the basis for the state and national level politics. There exists however, tendency of upward mobility among the leaders operating at lower levels. The prospects of acquiring power appeared first at the district level " ●**

या स्थानिक राजकारणाचा अभ्यास करण्यासाठी सातारा विधानसभा मतदार संघाची निवड करण्यात आली.[११]

---

**● Caste in Indian politics by Rajani Kothari, Orient Longman Limited, First Published Jun 1970. p. 304.**

सातारा तालुक्याचे राजकारण:

पहिल्या १९५२ च्या सार्वत्रिक निवडणूकीत साता-याचे पूर्व आणि पश्चिम असे दोन मतदार संघ होते. त्यातून कामगार किसान पक्षाचे व्ही. एन्. पाटील व बाबूराव घोरपडे या दोघांची लढत होऊन श्री. व्ही.एन्. पाटील विजयी झाले. त्यानंतर १९६२ मध्ये झालेल्या निवडणूकीत मात्र घोरपडे यांच्या ऐवजी धोंडीराम सिदोजी जगताप (दादासाहेब) यांना उमेदवारी मिळाली. त्यांनी व्ही.एन्. पाटील यांना पराभूत केले. घोरपडे यांना जिल्हापरिषदेचे उपाध्यक्षपद दिले गेले.

श्री. दादासाहेब जगताप हे यशवंतराव चव्हाणांचे शागिर्द. आमदार आणि उपमंत्री झाल्यावर त्यांनी तालुक्याच्या राजकारणात जम बसवावयास सुरुवात केली. तालुका पंचायत समितीच्या सभापती पदाबाबत त्यांच्या गटाचे घोरपडे यांच्या गटावर मात केली. जिल्हयाच्या व राज्याच्या राजकारणात ते बाळासाहेब देसाईच्या गटाकडे झुकले होते. १९६७ मध्येही घोरपडे यांनी तिकिटासाठी प्रयत्न केले. परंतु त्यांना आमदारकीच काय जिल्हा परिषदेतही संधी मिळाली नाही. जिल्हा कॉंग्रेसचे मात्र ते अध्यक्ष झाले. १९७२ मध्येही बाबूराव घोरपडे तिकिटाचे इच्छूक होते. जिल्हा कॉंग्रेसने आणि तालुका कॉंग्रेसने जगताप यांच्या नावाला आमदार पदासाठी विरोध केला. परंतु घोरपडे यांना जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष पदाचे आश्वासन देऊन तडजोड केली गेली. जगताप तिस-या वेळी निवडून आले परंतु यावेळी त्यांना मंत्रीपद मिळाले नाही.

जिल्हा परिषदेच्या निवडणूकीनंतर कॉंग्रेसमधील गटबाजी उफाळून आली अध्यक्ष पदासाठी निवडणूक झाली. वीर गटाचे बाबूराव घोरपडे आणि मोहिते गटाचे भागवतराव देसाई यांना समसमान मते मिळाली. शेवटी चिठ्ठया टाकल्या गेल्या आणि श्री. भागवतराव देसाई अध्यक्ष

गटाच्या नव्या आघाड्या तडजोडी होऊन पदाधिकारी दूर केले गेले. आणि श्री. घोरपडे यांना जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद मिळाले.

यानंतरच्या काळात दादासाहेब जगताप यांचे राजकीय महत्व संपले आणि घोरपडे यांचे महत्व वाढले. त्यामुळे १९७८ मध्ये आमदारकीसाठी घोरपडे यांना उमेदवारी मिळविणे कठीण गेले नाही. मात्र त्यांना नवीन आव्हान उभे राहिले होते. केंद्रात सत्ता बदलली होती आणि जनता पक्षातर्फे साताऱ्याच्या राजघराण्यातील अभयसिंह राजे भोसले उभे होते. त्यामुळे श्री. बाबूराव घोरपडे यांना बऱ्याच तपस्येनंतर उमेदवारी मिळूनही त्यांना जनतापक्षाच्या लाटेत पराभव पत्करावा लागला.

दिल्लीत जनता पक्ष सरकार कोसळल्यानंतर १९८० ला झालेल्या मध्यावधी निवडणूकीत अभयसिंहांनी काँग्रेस (आय) मध्ये प्रवेश केला. व १९८० ला काँग्रेस (आय) तर्फे उभे राहून विजयी झाले. आणि अंतुलेंच्या मंत्रिमंडळातील गृहखात्याचे राज्यमंत्री झाले. पुढे १९८२ ला बाबासाहेब भोसले मुख्यमंत्री झाल्यानंतर यांनी अभयसिंह भोसले यांना मंत्रीमंडळातून वगळले. इतकेच नव्हे तर सातारा येथे झालेल्या जाहीर सभेत अभयसिंह यांच्या थोरल्या वहिनी श्रीमंती कल्पनाराजे भोसले यांना व्यासपिठावर सन्मानाने बसविले. अभयसिंह यांची उपेक्षा केली. श्रीमती कल्पना राजे महत्वाकांक्षी असून त्यावेळेपासूनच त्या राजकीय संधीची वाट पहात होत्या. तथापि बाबासाहेबांची राजवट अल्पकाळीनच ठरली आणि १९८३ मध्ये महाराष्ट्राचे मुख्यमंत्री परत बदलले. फेब्रुवारी १९८३ मध्ये श्री. वसंतदादांचे मंत्रीमंडळ अधिकारावर आले व अभयसिंह भोसले पुन्हा मंत्री झाले. ते जिल्ह्यातील ते प्रमुख नेते झाले. मार्च, १९८५ मध्ये झालेल्या विधान सभा निवडणूकीमध्येही राजे निवडून आले व पुढे त्यांनी आपला महाराष्ट्राच्या राजकारणातील पाया भक्कम केला.[१२]

## सातारा जिल्ह्याचे महाराष्ट्राच्या राजकारणातील महत्त्व:

सातारा जिल्ह्याच्या राजकारणावर प्रांतिक राजकारणाचा मोठा प्रभाव आहे. यशवंतराव चव्हाण, मालोजीराजे निंबाळकर, बाळासाहेब देसाई, यशवंतराव मोहिते, किसनवीर यांच्या सारखे खंदे पुढारी या जिल्ह्याने पैदा केले.

सातारा जिल्ह्यात कॉंग्रेस पक्षाचे प्रमुख कार्यकर्ते म्हणून १९५२ च्या निवडणूकी पर्यंत भाऊसाहेब सोमण होते. त्यानंतरच्या काळात साताराच्या राजकारणात श्री यशवंतराव चव्हाण यांचा उदय झाला. त्यांच्या बरोबरच मंत्रिमंडळात साताराचे मालोजी राजे निंबाळकर व गणपतराव तपासे हे ही मंत्री झाले. यशवंतराव व मालोजी राजे निंबाळकर (फलटण) यांनी सातारा जिल्ह्यातील कॉंग्रेसचा जुना पुढारपणा मोडीत काढला. १९५६ साली चव्हाण मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झाले. १९५७ च्या निवडणूकीत सातारा लोकसभा मतदार संघातून ज्येष्ठ कॉंग्रेस नेते दादासाहेब आळतेकर यांचा पराभव झाला. त्या प्रमाणेच गाडगीळ, पाटणकर, करमळकर, कानवडे, मालोजी राजे, मोरोपंत जोशी या जुन्या पुढाऱ्यांचाही पराभव झाला. त्यामुळे यशवंतराव चव्हाण यांना महाराष्ट्र कॉंग्रेसवर आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यास संधी मिळाली. याच काळात यशवंतरावांनी सातारा जिल्ह्याच्या राजकारणावर ही आपले वर्चस्व प्रस्थापित केले.

कॉंग्रेस पक्षाची लोकप्रियता संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या काळात खूपच कमी झाली होती. यशवंतराव चव्हाण हे मात्र संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या वेळी कॉंग्रेस पक्षाच्या बाजूने होते. १९५७ च्या निवडणूकीत साताऱ्यात मालोजीराजे पडले. दादासाहेब जगताप (केंजळकर) पडले पण नव्या मुंबई विधानसभेत गुजरात व विदर्भ या भागात विजय मिळाल्यामुळे कॉंग्रेसला बहुमत

मिळाले. आणि मुंबई राज्याचे मुख्यमंत्रीपद पुन: श्री. चव्हाण यांना बहाल करण्यात आले. १९६० साली त्यांनी पं. नेहरु आणि कॉंग्रेस पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांचे मन वळविले आणि १ मे १९६० रोजी महाराष्ट्राची स्थापना झाली. चव्हाणांची लोकप्रियता वाढली आणि त्यांनी सातार्‍याच्या राजकारणावर वर्चस्व प्रस्थापित करावयास सुरुवात केली. पण यशवंतराव चव्हानांनी लोकमताविरुध्द राहूनही १९६० साली संयुक्त महाराष्ट्राचा मंगल-कलश आणला. त्यामुळे नंतरच्या काळात त्यांची लोकप्रियता खुप वाढली.

१९६२ पासून महाराष्ट्रात पंचायती राज संस्थांची स्थापना झाली. तेव्हापासून आजपर्यन्त सातारा जिल्हा परिषदेवर कॉंग्रेस पक्षाची पकड आहे. पंचायती राज संस्थामधूनच प्रतापराव भोसले, चिमणराव कदम, डॉ. भोईटे यांच्या सारखे नवे नेते व नेतृत्व या जिल्हयात निर्माण झाले. त्याच प्रमाणे सहकारी साखर कारखाने निर्माण झाले, यशवंतराव मोहिते, पी.डी. पाटील, डी.एस. देसाई यांचे वर्चस्व त्यांच्या साखर कारखान्यावर अवलंबून होते.

थोडक्यात सातारा जिल्हयाच्या राजकारणावर १९६० पासून कॉंग्रेस-पक्षाचे वर्चस्व आहे. जिल्हयातील सर्व संस्था कमी अधिक प्रमाणात या पक्षाकडेच आहेत. जिल्हा परिषद, पंचायत समित्या, जिल्हा मध्यवर्ती बँक व विविध साखर कारखान्यांवर कॉंग्रेसपक्षाची पकड आहे. १९७८ नंतर कॉंग्रेसमधील दोन गटात स्पर्धा झाल्यामुळे पक्षाचे सामर्थ्य विभागले होते. त्या काळात जनता पक्ष व शे.का. पक्ष यांनी काही जागा मिळविल्या. पण कॉंग्रेस पक्षाचे वर्चस्व कायम राहिले. आता शरद पवारांचा गट पुन्हा कॉंग्रेस आय पक्षात सामील झाल्यामुळे जिल्हयाच्या राजकारणावर कॉंग्रेसचे वर्चस्व पूर्णत: प्रस्थापित झाल्याचे दिसते. फलटणचे आमदार चिमणराव कदम यांच्या मते "प्रबळ असा विरोधी पक्ष अस्तित्वात नसल्यामुळे अनेकांना

काँग्रेस (आय) या राजकिय पक्षाशिवाय पर्यायच उरला नाही."

भारतातील स्थानिक राजकारणात पक्षीय राजकारणापेक्षा पंक्षांतर्गत गटबाजीचे राजकारण जास्त प्रभावीपणे चाललेले आढळते. सातारा जिल्ह्यातील काँग्रेस पक्षातही मोठया प्रमाणात गटबाजी होती. याचा परिणाम इतर तालुक्याच्या राजकारणावर होणे अपरिहार्य होते.[१३]

यशवंतराव चव्हाणांची कृषी औद्योगिक समाजाची संकल्पना:

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाल्यानंतर चव्हाणांनी कृषी औद्योगिक समाज स्थापन करण्याचा संकल्प व्यक्त केला. १ मे १९६० या दिवसाचे वर्णन त्या-वेळचे मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांनी "सोनियाचा दिवस" या शब्दाने केले होते. त्या शुभदिनी महाराष्ट्राचा "मंगल कलश" मराठी जनतेला प्राप्त झाला होता. मंगल कलश व सोनियाचा दिवस या शब्दातून समृध्द समताधिष्ठीत, संतुलित व पुरोगामी अशा महाराष्ट्राचे स्वप्न मुख्यमंत्री प्रसाद चिन्हे या अर्थाने व्यक्त करीत होते. त्या दिवशी महाराष्ट्राच्या कृषी-औद्योगिक समाजरचनेची मुहूर्त मेढ रोवली गेली. आज कृषी औद्योगिक विकास प्रवासाच्या टप्प्यावर आपण येऊन पोहोचलो आहोत.[१४]

कृषी औद्योगिक समाज व्यवस्था:

प्रथमत: चव्हाणांच्या कृषी औद्योगिक समाजरचना या संकल्पनेचा नेमका अर्थ समजून घेणे आवश्यक आहे. कारण त्यामुळे मुल्यमापनाचे निकष उपलब्ध होतात. स्व. यशवंतराव चव्हाण यांनी प्रारंभीच्या काळात केलेल्या काही जाहीर भाषणामधून ही संकल्पना स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. १ मे १९६० रोजी महाराष्ट्राच्या पहिल्या मंत्री मंडळाचा शपथविधी झाला त्यावेळच्या भाषणात त्यांनी पुढील विधान केलेले होते —

"आपल्या पंचवार्षिक योजनेचा सर्व भर ग्रामीण भागांची सुधारणा करण्यावर देण्यात आलेला आहे. ग्रामीण भागात पुन्हा नवचैतन्य निर्माण करण्याच्या ध्येयास सरकार बांधलेले आहे. या दृष्टीने शेतीच्या उत्पादन पध्दतीचे आधुनिकिकरण करणे आणि ग्रामीण विभागामध्ये विजेचा प्रसार करणे छोटया उद्योगधंद्याच्या वाढीस जोराची चालना देणे, या कार्य-क्रमांना अग्रहक्क देण्यात येईल. शेती संबंधित उद्योगधंद्यांच्या क्षेत्रात सहकारी पध्दतीस प्राधान्य देण्याबाबत या शासनाचा आग्रह राहिल" (अ)

महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळाच्या मुंबई येथे १९ मे १९६० च्या भाष-णात श्री चव्हाण म्हणाले की, कृषी-औद्योगिक समाजव्यवस्थेचा पाया घालण्याचे उद्दिष्टही राज्यांच्या तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत स्वीकारण्यात आले आहे. ग्रामीण भागात उद्योगधंदे काढून ग्रामीण जीवनाशी ते एकजीव करावयाचे आणि शेती व ग्रामीण उद्योगधंदे यांची सांगड घालावयाची हाच याचा अर्थ आहे. ग्रामीण भागात या प्रमाणे शेत मालावर प्रक्रिया करणारे उद्योगधंदे निघाल्यास शहरी भागातील उद्योगधंद्याकडे कच्च्या मालाची वहातूक करण्याचे परिश्रम वाचतील. शिवाय ग्रामीण भागातील या उद्योगधंद्यामुळे शेतकरी वर्गास एक रोजगारीचे एक साधन उपलब्ध होईल आणि त्यामुळे त्यांच्या उत्पन्नात वाढ होऊन त्यांच्या राहणीचा दर्जाही सुधारेल. (ब)

थोडक्यात चव्हाण साहेबांच्या वरील संकल्पनांचा एकत्रित विचार केल्यास कृषी औद्योगिक समाजव्यवस्था त्यांना व पर्यायाने शासनाला मान्य असणारा अर्थशास्त्रीय अर्थ पुढील प्रमाणे सांगता येईल.

---

अ) सह्याद्रीचे वारे, पृष्ठ ५६.

ब) सह्याद्रीचे वारे, पृष्ठ ११९.

१. आर्थिक विकासासाठी शेतीव उद्योग यांच्या विकासाला समान महत्त्व देणारे धोरण शासनाला आवश्यक वाटते. फक्त औद्योगिक विकासाने आर्थिक विकास होऊ शकतो ही भूमिका मान्य नाही.

२. कृषी-औद्योगिक विकासासाठी शासनाने कृषी-क्षेत्रातील उत्पादकता वाढविणे, कृषी मालावर प्रक्रिया करणारे उद्योगधंदे ग्रामीण भागात काढणे हा मार्ग स्वीकारावा असे ठरले.

३. कृषी मालावर औद्योगिक प्रक्रिया करणारे उद्योगधंदे सहकारी क्षेत्रात असावेत व लघुउद्योगधंदयांना प्रोत्साहन द्यावे.

४. कृषी क्षेत्राचे आधुनिकीकरण करण्यासाठी ग्रामीण विद्युतीकरण अत्यावश्यक आहे.

५. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विकासाशिवाय खऱ्या अर्थाने सर्वकष आर्थिक प्रगती शक्य नाही असा शासनाचा विश्वास होता.

या कृषी उद्योगांच्या विकासामुळे ग्रामीण भागातील शेती, भांडवल रोजंदारी, उत्पन्न, संयोजन या विकास शक्तीना वाव मिळून ग्रामीण भागाला व्यापक विकास प्रक्रियेत महत्त्वाचा सहभाग मिळाला. त्यामुळे औद्योगिक उत्पादनाची संरचना बदलली. उत्पादन वाढ, शहरीकरण, विजेचा वापर, उत्पादन, संरचनेतील बदल, मुलभूत सेवा सुविधांची उपलब्धी, भांडवल गुंतवणूक, कर्जपुरवठा, औद्योगिक आकृतीबंधाचे विकसन, रोजगार निर्मिती अशा विविध क्षेत्रात राज्याने प्रगती केली.

महाराष्ट्र राज्यनिर्मिती ही महाराष्ट्रीय जन समूहाच्या ऐतिहासिक संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाचे फलित होय. संयुक्त महाराष्ट्र चळवळ ही काही मराठी जनतेच्या केवळ भाषिक अस्मितेचा भावनात्मक उद्रेक किंवा उमाळा नव्हता. मराठी भाषिकांचे राज्य एवढीच संकुचित भावना व प्रेरणा त्यामागे नव्हती

केवळ मराठी भाषिकांच्या हाती घटक राज्याची सत्ता यावी एवढयाचसाठी तो खटाटोप नव्हता. भारतीय राज्यघटनेत जी मूल्ये अंगभूत व अभिप्रेत आहेत त्या मूल्यांच्या आधारावर महाराष्ट्राच्या औद्योगिक क्षेत्रावर मराठी भाषेचा जो जनसमूह, त्या जनसमूहाच्या जीवनाची नवउभारणी करणे त्या मूल्यांचा अविष्कार व अनुभव देणारी समाजव्यवस्था निर्माण करणे हा क्रांतिकारक उद्देश त्या जन आंदोलनामागे होता. "महाराष्ट्र जगला तर राष्ट्र जगलं" या सेनापती बापटांच्या वा "समाजवादाचा पाळणा प्रथम महाराष्ट्रात हालेल" या श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या उद्‌गारात मराठी मनाचे दर्शन घडते.

महाराष्ट्र राज्य निर्माण झाले आणि महाराष्ट्रीय जनता एका नव्या उमेदीने नव समाजनिर्माण कार्याला लागली. प्रस्थापित सरंजामी भांडवली समाज रचनेत अंतर्भूत असलेल्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, विषमतेच्या अपप्रवृत्ती, त्यात अस्तित्वात असलेले दैन्य व दारिद्र्य, बहुसंख्यांकांच्या वाटयाला येत असलेली अप्रतिष्ठा व अवहेलना, निकृष्ट रहाणीमान, अज्ञान व निर निरक्षरता, दैववाद यांची घट्ट पकड इ.चे निर्मूलन करण्यासाठी महाराष्ट्र राज्य वचनबध्द होते. महाराष्ट्राचे तत्कालिन सत्ताधारी पक्षाचे नेते व नवराज्याचे पहिले मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र राज्याला नवा आकार व आशय प्राप्त करुन देण्याचा प्रयत्न सुरु झाला.[१६]

## सहकार, स्थानिक शासन, पंचायती राज्य याद्वारे औद्योगिक विकास:

कृषी औद्योगिक समाज उभारणीचे सहकार, स्थानिक शासन व शिक्षण हे महत्त्वाचे आधार होत. सहकाराच्या माध्यमातून ग्रामीण जीवनाचे संपूर्ण परिवर्तन व्हावे या विचाराने राज्यशासनाने सहकारी चळवळीला चालना दिली. महाराष्ट्र राज्याने अन्य घटक राज्यापेक्षा सहकाराच्या क्षेत्रात लक्षणीय प्रगती केली आहे.

कृषी औद्योगिक विकासाला आवश्यक असणारा पतपुरवठा करण्यासाठी प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्था, मध्यवर्ती सहकारी बँका, राज्य सहकारी बँका, शहरी विभागात उद्योग व व्यापार यासाठी पतपुरवठा करण्यासाठी नागरी सहकारी बँका यांचा विकास मोठया प्रमाणावर होत आहे. तसेच शेती मालास किफायतशीर भाव मिळावेत. शेतकऱ्यांचे शोषण होऊ नये. म्हणून सहकारी विपणन संस्था, नियमित बाजारपेठा यांना कार्यप्रवण करण्यात आले.

कृषी औद्योगिक समाजात केवळ आर्थिक शक्तीचे वा अर्थसमतेचे विकेंद्रीकरण अभिप्रेत नाही. तर राजकीय व प्रशासकीय सत्तेचे विकेंद्रीकरण अपेक्षित आहे. स्थानिक पातळीवरील लोकांचा विकास प्रक्रियेसंबंधी व निर्णयात व कार्यवाहीत सहभाग असेल तरच ही प्रक्रिया वेगवान व अर्थपूर्ण होऊ शकेल. १९६२ पासून महाराष्ट्र राज्यात विकेंद्रीत लोकशाहीच्या पंचायत राज्याच्या प्रयोगाला प्रत्यक्ष सुरुवात झाली. कृषी औद्योगिक समाज रचना अर्थपूर्ण होण्यासाठी ग्रामीण भागातील लोकांना विकासाची नेमकी कोणती प्रक्रिया पाहिजे हे योग्य पध्दतीत ठरवावयाचे झाल्यास राज्याचे धोरण व त्याची कार्यवाही या प्रक्रियेत म्हणजेच एकूण प्रशासन व्यवस्थेत स्थानिक पातळीपासून ग्रामीण मत प्रदर्शनास परिणामकारक पध्दतीने सहभाग मिळाला पाहिजे हे लक्षात घेऊन १९६२ पासून महाराष्ट्र राज्यात विकेंद्रीत लोकशाहीच्या पंचायत राज्याच्या प्रयोगाला प्रत्यक्ष सुरुवात झाली. ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका या स्थानिक शासन देशातील अन्य घटक राज्यातील स्थानिक शासनापेक्षा अधिक कार्यक्षम व यशस्वी आहे. पंचायत राज्याने स्थानिक नेतृत्वाच्या विकासाच्या कक्षा व सामर्थ्य वाढविले आहे.[१७]

सातारा जिल्ह्यातील बदल:

सातारा जिल्ह्याचे एकून तीन विभाग पडत असून पश्चिम भाग हा अतिपावसाचा, डोंगराळ व हलक्या प्रतीच्या जमिनीचा आहे. जिल्ह्याचा मध्यभाग हा पूणे-बंगलोर रस्त्याच्या कडेचा, तसेच हमखास पावसाचा भाग असून तेथे ७०० ते १००० मि.मि. पाऊस पडतो. जिल्ह्याचा पूर्वभाग हा अवर्षण प्रवण असून यामध्ये खटाव, माण, फलटण, खंडाळा व कोरेगाव या तालुक्यांचा समावेश होतो.

सातारा जिल्ह्यात सन १९०६ च्या सुमारास माण तालुक्यातील बोथे या डोंगरावरील गावात पहिल्या सहकारी संस्थेची मुहूर्तमेढ रोवली गेली.

सातारा जिल्ह्याचे व महाराष्ट्राचे नेते यशवंतराव चव्हाण यांनी दिलेल्या नेतृत्वामुळे व प्रेरणेमुळे सातारा जिल्ह्यात आज औद्योगिक, पाट-बंधारे व सहकारी क्षेत्रात प्रगतीपथावर आहे हे जून १९८७ च्या आकडे-वारीवरून स्पष्ट दिसते.

सहकारी संस्था:

| अ.नं. | संस्थेचे नाव | संख्या जून १९८७ |
|---|---|---|
| १. | जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक | १ |
| २. | प्राथमिक शेतकरी सहकारी संस्था | ७६१ |
| ३. | कृषक सहकारी सेवा संस्था | ३ |
| ४. | नागरी सहकारी बँका | १३ |
| ५. | पगारदार नोकर, नागरी सहकारी बँक | २ |
| ६. | पगारदार नोकर बिगर शेती पतपुरवठा संस्था | १३० |
| ७. | इतर सहकारी पतसंस्था | ९२ |

| अ.नं. | संस्थेचे नाव | संख्या जून १९८७ |
|---|---|---|
| ८. | जिल्हा खरेदी विक्री संघ | १ |
| ९. | तालुका सहकारी खरेदी विक्री संघ | १० |
| १०. | सहकारी साखर कारखाने | ७ |
| ११. | सहकारी तेल घाणी | १ |
| १२. | कॉटन जिनिंग-प्रेसिंग संस्था | ७ |
| १३. | इतर प्राक्षा, रवा, प्रक्रिया संस्था | १९ |
| १४. | सहकारी सूत गिरण्या | २ |
| १५. | प्राथमिक यंत्रमाग विणकर सहकारी संस्था | ११ |
| १६. | हातमाग विणकर सहकारी संस्था | १ |
| १७. | लोकर हातमाग विणकर सहकारी संस्था | ३ |
| १८. | जिल्हा औद्योगिक सहकारी संस्था | १ |
| १९. | प्राथमिक इतर औद्योगिक संस्था | १३४ |
| २०. | दुग्ध सहकारी संघ | ७ |
| २१. | प्राथमिक मच्छिमार सहकारी संस्था | ८४८ |
| २२. | मध्यवर्ती मच्छिमार सहकारी संस्था | १ |
| २३. | कुक्कुट पालन सहकारी संस्था | ५८ |
| २४. | सहकारी शेती संस्था | १० |
| २५. | प्राथमिक इतर पशु उत्पन्न सहकारी संस्था | १ |
| २६. | सहकारी पाणीपुरवठा संस्था | ३५८ |
| २७. | जंगल कामगार सहकारी संस्था | ४ |
| २८. | मध्यवर्ती ग्राहक भांडार | ५९ |
| २९. | सहकारी गृहनिर्माण संस्था | १४५ |
| ३०. | सहकारी वहातून संस्था | ७ |
| ३१. | मजूर सहकारी संस्था | २२४ |
| ३२. | जिल्हा सहकारी देखरेख संस्था | १ |
| ३३. | इतर सामाजिक सेवा संस्था | १६ |

| अ.नं. | संस्थेचे नाव | संख्या जुन १९८७ |
|---|---|---|
| ३४. | जिल्हा सहकारी बोर्ड | १ |
| ३५. | जिल्हा सहकारी संघ फेडरेशन | ७ |

वरील सहकारी संस्था खेरीज आरोग्य, शिक्षण, पिण्याचे पाणी पुरवठा योजना या बाजूने सातारा जिल्ह्याचा पूर्ण विकास होऊन सातारा जिल्ह्यात अनेक नवीन बदल घडून आलेले दिसतात. याशिवाय रस्ते, एस्.टी. वहातूक, रोजगार हमी योजना, एकात्मिक ग्रामीण विकास योजना या सारख्या प्रकल्पाने सातारा जिल्हा प्रगतीपथावर आहे हे स्पष्ट दिसते.

## नवीन धरणे:

सातारा जिल्ह्यात सर्वात मोठा कोयना प्रकल्प आहे. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळात महाराष्ट्र राज्य निर्मितीनंतर १९६० नंतर हा प्रकल्प पूर्ण झाला त्याच्याही अगोदर वीर धरण पूर्ण झाले आहे. अलिकडच्या काळात धोम धरण, व कण्हेर धरण हे दोन मोठे प्रकल्प तयार झाले आहेत.

कृष्णा व तिची उपनदी वेण्णा या दोन्ही नदयांच्या जलसंपत्तीचा सिंचनासाठी जास्तीत जास्त वापर व्हावा या हेतूने कृष्णा पाटबंधारे प्रकल्प हाती घेण्यात आला. कृष्णा प्रकल्पामध्ये धोम ता. वाई या ठिकाणी कृष्णा नदीवर धोम धरण व कण्हेर तालुका सातारा या ठिकाणी वेण्णा नदीवर कण्हेर धरण अशी दोन धरणे व त्यापासून कालव्याद्वारे कृष्णा व वेण्णा नद्यांच्या दोन्ही तिरावरील सातारा व सांगली जिल्ह्यातील क्षेत्रास सिंचनाचा लाभ झाला आहे.

याशिवाय पाटबंधारे प्रकल्पामध्ये सातारा जिल्हयात मध्यम प्रकल्प आहेत. नेर, राणंद, तारळी, खोडशी, कृष्णा कालवा, येरळवाडी, तांबवे यावर भिजणारे एकून क्षेत्र १०,८३० हेक्टर आहे.

तसेच आज मंजूर व काम चालू असलेले येवती-म्हासोली, मोरणा प्रकल्प (पाटण), आंधळी (माण), उरमोडी (सातारा) हे आहेत.

याशिवाय जिल्हा परिषदेच्या पाझर तलाव योजना आहेत. पाझर तलाव ४७३, लहान बंधारे ५९६ उपसा जलसिंचन योजना ५६ आहेत.[१९]

सातारा जिल्हयातील औद्योगिक वसाहत व नवीन कारखाने:

सातारा जिल्हा सह्याद्री पर्वताच्या पूर्व बाजूस पसरलेला आहे. कृष्णा कोयना वेण्णा, कुडाळी दक्षिण व उत्तर मांड, वसना, माणगंगा, येरळा व निरा या नद्यांची सुपीक खोरी वगळता बाकी भाग डोंगराळ आहे. सन १९८१ चे खानेसुमारी प्रमाणे लोकसंख्या २०,४१,४०९ आहे. पुणे-बंगलोर राष्ट्रीय महामार्ग व पुणे-मिरज ब्रॉडगेज लोहमार्ग या जिल्हयातून उत्तर दक्षिण गेलेले आहेत. जिल्हयाचे भौगोलिक क्षेत्रफळ १०,५८,३०१ हेक्टर आहे. जिल्हयामध्ये सातारा, कराड, फलटण, वाई, महाबळेश्वर, पाचगणी, रहिमतपूर, म्हसवड, कोरेगाव, वडूज, खंडाळा, शिरवळ, मेढा, पाटण ही प्रमुख मोठी गावे (शहरे) आहेत. आणि ११८२ गावे आहेत. सातारा, कराड, लोणंद, खंडाळा, फलटण (ता. माळ) येथे पाच औद्योगिक प्रशिक्षण केंद्रे असून सातारा व कराड येथे इंजिनिअरिंग कॉलेज आहेत. तसेच एकूण पाच पालीटेक्नीक आहेत.

मध्यवर्ती सरकारचे माहे डिसेंबर १९७७ मध्ये जाहीर केलेल्या औद्योगिक धोरणामध्ये ग्रामीण भागात मोठया प्रमाणावर रोजगार उपलब्ध करुन ग्रामीण जनतेची आर्थिक स्थिती सुधारणे हे प्रमुख अंग आहे. त्यानुसार ग्रामीण भागात

छोटे उद्योग धंदे वाढविण्यासाठी काही नव्या व महत्वाकांक्षी योजना राबविण्यासाठी संपूर्ण देशभर जिल्हा उद्योग केंद्र स्थापन करणे हा प्रमुख उद्देश आहे. त्यानुसार जिल्हा उद्योग केंद्र सातारा दि. १५/३/७९ पासून कार्यान्वीत झाले. त्यानुसार सातारा येथे औद्योगिक विकास महामंडळाने औद्योगिक वसाहत विकसित केली आहे. सध्या सातारा औद्योगिक वसाहतीमध्ये एकून १३१ उद्योग सुरु आहेत. याशिवाय वाई, कराड, फलटण येथे एम्.आय.डी.सी.ने जागा संपादन करुन विकसीत करण्याचे काम चालू आहे.

सध्या सातारा जिल्हा उद्योगकेंद्रात ९५० लघुउद्योग रजिस्ट्रेशन झाले आहेत. त्या लघुउद्योगापैकी २० मध्यम व मोठे उद्योग आहेत. सातारा जिल्हयात गेल्या दशाकात एम्.आय.डी.सी.च्या विकास होऊन लघुउद्योगांची वाढ झाली आहे. आज एम्.आय.डी.सी. परिसरात आहेत तर ४५० लहान उद्योग सातारा शहराच्या परिसरात आहेत.

त्यापैकी काही महत्त्वाचे प्रकल्प खालील प्रमाणे
सात सहकारी साखर कारखाने आहेत.
व्हल्कन लाव्हल प्रा.लि. सातारा
मॅफको फॅक्टरी कोरेगाव
शिर्के पेपर मिल प्रा. लि. शिरवळ
वालचंद्र नगर इंडस्ट्रिज लि. सातारा रोड
डोबर्ग प्रा. लि. सातारा
युनिव्हर्सल लगेच मॅन्यु कं. प्रा. लि. सातारा
महाराष्ट्र स्कूटर
पी.एम्.पी. ऑटोमोबाईलस् प्रा. लि.
भारत फोर्ज कं. लि. जांडेश्वर
हे प्रमुख उद्योग कारखाने चालू आहेत.[२०]

सातारा जिल्ह्यातही थोडक्यात कृषी औद्योगिक समाज स्थापन करण्याचे प्रयत्न १९६० पासून सहकार पंचायती राज्य या क्षेत्रात सुरु झाले.

## सातारा जिल्ह्यातील तालुक्यांचा राजकीय आढावा:

सातारा जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्याची राजकीय [redacted] परिस्थिती पाहिल्यास प्रत्येक मतदार संघामध्ये मंत्रीपदास योग्य असे नेतृत्व उदयास आल्याचे आपणास दिसते.

### फलटण तालुका:

फलटण तालुक्यामध्ये प्रथम मालोजी राजे निंबाळकरांचा प्रभाव होता व त्यांच्यानंतर डॉ. कृष्णचंद्र भोईटे व मध्यंतरीच्या काळात शिवाजीराव निंबाळकर व त्यानंतर आज आमदार चिमणराव कदम यांचा या तालुक्यामध्ये प्रभाव असल्याचे दिसून येते.

### कोरेगाव:

कोरेगाव मध्ये दत्ताजीराव बर्गे यांचा प्रथम प्रभाव होता. त्यानंतर शंकरराव जगताप याचा पराभव करुन निवडून आले व आज ही शंकरराव जगताप यांचाच या तालुक्यामध्ये प्रभाव असल्याचे आपणास दिसते.

### पाटण:

पाटणमध्ये बाळासाहेब देसाई असे पर्यंत त्यांचा संपूर्ण तालुक्यावर प्रभाव होता व त्यानंतर शिवाजीराव देसाई यांचा प्रभाव होता. परंतु त्यांचे नेतृत्व कारखान्यापुरते मर्यादीत राहिले. त्यांच्या नंतर आमदार विक्रमसिंह पाटणकर यांचा या तालुक्यावर कायम प्रभाव असल्याचे आपणास दिसते.

### कराड:

कराडमध्ये यशवंतराव मोहिते, विलासराव पाटील, पी.डी. पाटील

यांचा तालुक्यावर कायम प्रभाव असल्याचे दिसून येते. परंतु अलिकडच्या काळात आ. शामराव आष्टेकरांचा मंत्री झाल्यापासून या तालुक्यावर प्रभाव आहे असे दिसते.

वाई:
====

वाई तालुक्यामध्ये पहिल्यापासून सातारा जिल्हयांचे नेते किसनवीरांचा प्रभाव होता. त्यांच्या नंतर श्री. प्रतापराव भोसले यांनी प्रभाव निर्माण केला व आज श्री. प्रतापराव भोसले हे सातारा लोकसभा मतदार संघातून लोकसभेवर निवडून गेल्यानंतर आमदार मदनराव पिसाळ यांचा प्रभाव आपणास दिसतो.

जावळी:
======

जावळी मतदार संघामध्ये प्रथम लालासिंगराव शिंदे, त्यांच्यानंतर आम. डी.बी. कदम यांचा या तालुक्यावर प्रभाव होता व त्यानंतर आज आम. जी.जी. कदम यांचा या तालुक्यावर आपणास प्रभाव दिसतो.

सातारा:
=======

सातारा तालुक्यामध्ये सुरुवातीस बाबुराव घोरपडे त्यांच्यानंतर दादासाहेब जगताप (कराड) व जगताप यांच्यानंतर मा. अभयसिंह राजेभोसले यांचा या तालुक्यावर प्रभाव आपणास कायम दिसून येतो.

खटाव:
=====

खटाव मध्ये मा. चंद्रहार पाटील यांचा खटाव तालुक्यावर कायम प्रभाव होता. त्यानंतर केशवराव पाटील व त्यांच्यानंतर नवीन नेतृत्व आम. भाऊसाहेब गुदगे यांचे नेतृत्व हळूहळू उदयास येऊ लागले.आहे. आज १९८५ पासून आम. भाऊसाहेब गुदगे हेच आमदार आहेत.

त्याच प्रमाणे माण हा तालुका कायम राखीव मतदारसंघ आहे. त्याच प्रमाणे खंडाळा तालुका हा फलटण व वाई मतदार संघामध्ये विभागला गेला आहे. महाबळेश्वर हा जावळी व वाई मध्ये विभागला आहे. त्यामुळे त्या तालुक्यांचे नेतृत्व जिल्हापरिषद, पंचायत समिती. किंवा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्षपद इथपर्यंत येऊन पोहचले आहे.

अशाप्रकारे या सातारा जिल्ह्यातील सर्व तालुक्यांचा विचार केल्यास आपणास स्पष्ट दिसते कि प्रत्येक तालुक्यात जे नेतृत्व उदयास येत गेले ते मंत्री पदाच्या योग्यतेचे नेतृत्व उदयास आलेले आहे.

विभागीय विकासाचा असमतोल:

सातारा जिल्ह्यामध्ये सातारा तालुक्याची आज जरी थोडीफार औद्योगिक व शेतीविषयक प्रगती दिसत असली तरी सातारा जिल्ह्याच्या मानाने सातारा तालुका एम्.आय.डी.सी. स्थापनेपर्यंत मागासलेलाच राहिलेला दिसतो. सातारा जिल्ह्यातील इतर तालुक्यांच्या तुलनेने १९७९ पर्यंत सातारा तालुका औद्योगिक विकासाच्या बाबतीत मागासलेलाच राहिला. कारण सातारा तालुक्याचा १९५२ पासून नेतृत्व लाभले. उदा. व्ही.एन्. पाटील, दादासाहेब जगताप हे नेतृत्व सातारा तालुक्या बाहेरचे होते. त्यामुळे सातारा तालुक्याच्या विकासाकडे म्हणावे तेवढे लक्ष दिले गेले नाही. थोडक्यात स्थानिक नेतृत्वाचा अभाव होता. याशिवाय या जिल्ह्यातील मोठे नेतृत्व म्हणून यशवंतराव चव्हाणांच्याकडे पाहिले जाते. १९८० पर्यंतच्या सर्व लोकसभा निवडणूका यशवंतराव चव्हाणांनी सातारा लोकसभा मतदार संघातूनच लढविल्या व ते विजयी सुध्दा होत गेले. परंतु सातारा तालुक्याच्या विकासाकडे पाहिजे त्या प्रमाणात त्यांनी लक्ष दिले नाही. तसेच यशवंतराव चव्हाणांच्या नेतृत्वामुळे तालुक्यामध्ये दुसरे मोठे असे नेतृत्व १९७७ पर्यंत निर्माण होऊ शकले नाही. म्हणजेच मोठया वडाच्या झाडाखाली लहान गवत येत नाही हे साताऱ्च्या राजकारणात सिध्द झाले.

थोडक्यात स्थानिक नेतृत्वाच्या अभावामुळे या तालुक्याचा विकास झाला नाही. परंतु त्याच बरोबर पाटण, फलटण, कराड, वाई या तालुक्याचा विकास झाला कारण त्यांना स्थानिक नेतृत्व मिळाले व त्यांनी आपल्या तालुक्याच्या विकासाच्या दृष्टीने प्रयत्न केले.

थोडक्यात सातारा जिल्हयामध्ये विकासाचा असमतोल झालेला दिसतो. त्याला सर्वात मोठे कारण स्थानिक नेतृत्व असे म्हणावे लागेल व त्यात बरोबर मा. दादासाहेब जगताप यांच्या मते नैसर्गिक परिस्थिती ही त्याला कारणीभूत होती. कारण सातारा तालुक्याचा पश्चिम भागात बराच डोंगराळ व निकृष्ठ प्रतीची जमिन पूर्व भाग पावसाच्या जीवावर अवलंबून त्यामुळे विकासाच्या बाबतीत सातारा तालुका मागासलेला राहिला.

## सातारा तालुक्याचे राजकारण:

सातारा तालुक्याच्या राजकारणाचा आढावा घेतला असता आपणास लक्षात येते, की १९५२, १९५७ या दोन्ही वेळी विरोधी पक्षाचे उमेदवार व्ही.एन्. पाटील होते व १९५२ मध्येच सातारा पश्चिम मधून बाबुराव घोरपडे निवडून कॉंग्रेस तर्फे आले. परंतु सातारा एकसंध मतदार संघ झाल्यानंतर मधला संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा काळ सोडला तर या तालुक्यावर कायम कॉंग्रेस-ची पकड आहे हे लक्षात येते. १९६२, १९६७ व १९७२ या तिन्ही विधान सभा निवडणूकीत कॉंग्रेस तर्फे दादासाहेब जगताप निवडून आले. परंतु या-ठिकाणी एक गोष्ट लक्षात घ्यावी लागते ती ही कि बाबुराव घोरपडे हे सोडले तर १९७७ पर्यंत सातारा तालुक्याला तालुक्याबाहेरचे नेतृत्व मिळालेले दिसते. १९७७ नंतर साताराच्या राजघराण्यातील मा. अभयसिंह भोसले यांनी राजकारणात जनता पक्षातर्फे प्रवेश केला व लगेच १९८० च्या निवडणूकीत कॉंग्रेस (आय) पक्षात प्रवेश करुन त्यांनी आपले राजकारणात पाय घट्ट रोवले.

अभ्यासाचा उद्देश व संशोधन पध्दती:

सातारा तालुक्याच्या राजकारणाच्या अभ्यासाची खालील चार उद्दिष्टये आहेत.

१) स्थानिक राजकारणामध्ये विशेषत: सातारा तालुक्याच्या राजकारणामध्ये विविध राजकीय पक्षांनी कशा प्रकारे आपल्या भूमिका बजावल्या याचा अभ्यास करणे.

२)तालुका स्तरावरच्या राजकारणामध्ये नवे राजकीय नेतृत्व का ? व कशा प्रकारे निर्माण होते ? सातारा तालुक्याच्या राजकारणामध्ये श्री. अभयसिंह राजेभोसले यांचे नेतृत्व गेल्या १० वर्षात कशा प्रकारे निर्माण झाले ? याचा अभ्यास करणे.

३) तालुक्याच्या राजकारणामध्ये आणि नेतृत्वाच्या जडण घडणीमध्ये नगरपालिका सहकारी संस्था पंचायत राजसंस्था इत्यादी स्थानिक संस्थांची कोणती भूमिका असते आणि विकास कार्याचा काय फायदा होतो ते पहाणे.

४) तालुक्याच्या राजकारणामध्ये पक्षीय राजकारणाच्या अंतर्गत राजकीय गटांची स्पर्धा कशा प्रकारे काम करते आणि त्याचा राज्यस्तरावरील राज्यकारणाशी कशा प्रकारचा संबंध असतो त्याचा अभ्यास करणे ही या शोध प्रबंधाच्या अभ्यासाची मुख्य उद्दिष्टये आहेत.

स्थानिक राजकारणाचा अभ्यास करणे आज वरचेवर गरजेचे बनत चालले आहे. कारण त्याशिवाय राज्यस्तरीय व केंद्रस्तरीय राजकारणामागची गती तत्त्वे आपणास लक्षात येणार नाहीत. स्थानिक राजकारणात विविध

राजकीय संस्थांच्या बरोबरच नेतृत्वाची भूमिकाही महत्त्वाची असते. विकास कामांचीही त्यात मोलाची भूमिका असते. म्हणून सातारा तालुक्यातील पक्षीय राजकारणाचा अभ्यास या प्रबंधात करण्यात आला आहे. या काळात साताऱ्यातील जुने नेतृत्व अस्तंगत झाले व नवे नेतृत्व पुढे आले. त्या नेतृत्वाने आपले स्थान बळकट करीत राज्यसरकारात प्रवेश केला व राज्य स्तरावरील राजकारणाशी एक दुवा निर्माण केला ही संपूर्ण प्रक्रिया गेल्या दहा वर्षात कशाप्रकारे झाली हे तपासण्याचा यामागे मुख्य हेतू आहे.

या अभ्यासासाठी ऐतिहासिक पध्दतीचा अवलंब केला आहे, त्यानुसार पूर्वी घडलेल्या घटनांची क्रमवार व सुसंगत रितीने मांडणी करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यासाठी स्थानिक वृत्तपत्रे स्मरणिका अहवाल, पुस्तके व इतर दुय्यम स्वरूपाची साधने वापरण्यात आली आहेत. या राजकीय प्रक्रियेत भाग घेणाऱ्या महत्त्वाच्या राजकीय पुढाऱ्यांची विस्तृत मुलाखत घेण्यात आली आहे. सातारा तालुक्यातील गेल्या १० वर्षांच्या राजकारणाचा सुसंगत सुत्रबध्द आणि ऐतिहासिक दृष्टिकोनातून अभ्यास करण्याचा प्रयत्न यात करण्यात आला आहे.

........

## प्रकरण पहिले

## संदर्भ ग्रंथ


१. माहिती व जनसंपर्क महासंचालनालय : महाराष्ट्रातील जिल्हा सातारा
महाराष्ट्र शासन मुंबईतर्फे प्रकाशित,
आक्टोबर १९८८, पृष्ठ नं. १,३,७.

२. ठोके मो.नि. – श्रमिकांचा कैवारी (क्रांतिसिंह नाना पाटील
यांच्या चरित्र) पारस प्रकाशन, बेळगाव,
६ डिसेंबर १९८३, पृष्ठ नं. १७.

३. माहिती व जनसंपर्क महासंचालनालय – महाराष्ट्रातील जिल्हे सातारा
महाराष्ट्र शासन मुंबई तर्फे प्रकाशित
आक्टोबर १९८८, पृष्ठ नं. १.

४. रानडे, म.गो. – मराठी सत्तेचा उत्कर्ष व –हास.
पृष्ठ नं. 1, 2

५. पाटील, रा.तु. – सांगली साता–याचे राजकारण, परखड
प्रकाशन तडसर, जि. सांगली, नोव्हे.१९५६,
पृष्ठ नं. ३.

६. ठोके, मो.नि. – तत्रैव, पृष्ठ क्र. २२, २३, २४.

७. पाटील, रा.तु. – तत्रैव, पृष्ठ नं. ३१, ३२, ३३.

८. तत्रैव, पृष्ठ नं. २४, २५, २६, २७.

९. तत्रैव, पृष्ठ नं. ३४, ३५.

११. शेंडे, ज.दा. – फलटण तालुक्यातील पक्षीय राजकारण (इ.स.१९७७ ते १९८५ एक टिकात्मक अभ्यास) शिवाजी विद्यापीठाच्या एम्.फिल्.(राज्यशास्त्र) पदवी परीक्षेसाठी सादर केलेला. अप्रकाशित शोध निबंध ५ मे, १९८७, पृष्ठ नं. ६.

१२. दैनिक सकाळ पुणे ७ फेब्रुवारी १९९०.

१३. शेंडे, ज.दा. – तत्रैव, पृष्ठ १४, १५, १६, १७.

१४. गरूड शांताराम (संपा.) – महाराष्ट्र राज्य रौप्य महोत्सवी वर्ष, कृषी औद्योगिक समाजाची २५ वर्षे, मे, १९८५. लेख– कृषी औद्योगिक समाजाची वाटचाल, पृष्ठ १.

१५. तत्रैव – लेख – कृषी औद्योगिक विकासाची २५ वर्षे पृष्ठ ७, ११, १२, १३, १४.

१६. तत्रैव – लेख– कृषी औद्योगिक समाजाची वाटचाल, पृष्ठ २, ३.

१७. तत्रैव – पृष्ठ नं. ८, ९.

१८. माहिती व जनसंपर्क म महासंचलनालय – महाराष्ट्रातील जिल्हे सातारा महाराष्ट्र शासन मुंबई तर्फे प्रकाशित, आक्टोबर, १९८८, पृष्ठ ६, ११.

१९. माहिती व जनसंपर्क महासंचलणालय - महाराष्ट्रातील जिल्हे सातारा महाराष्ट्र शासन मुंबई तर्फे प्रकाशित आक्टोबर १९८८, पृष्ठ ९, ११. पृष्ठ क्र. १५, १६, १७, ३८.

२०. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योगकेंद्र सातारा - उद्योजकांसाठी मार्गदर्शक १९८७, पृष्ठ क्र. १, ७, ३५, ३६.

.......